| MHSN060030482023 | **म.सं.कौ.हिं.का. अर्ज नं.९७/२०२३**<br>सौ. अनिता संजय देसाई वगैरे वि.<br>श्री. संजय अरुण देसाई वगैरे |
|---|---|

## अर्ज नि.क्र.१० वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांनी त्यांच्या विरुध्द झालेला "विना म्हणणे" आदेश रद्द होऊन त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** जाबदार यांच्या अर्जामधील कथन असे की, ते आजारी असल्यामुळे वकीलांना भेटून प्रस्तुतकामी लागणारी माहिती व आवश्यक कागदपत्रे वेळेत देऊ शकले नाही. त्यामुळे दि.०५/०४/२०२४ रोजी त्यांच्या विरुध्द झालेला "विना म्हणणे" चा आदेश पारीत झालेला आहे. जाबदार यांनी म्हणणे देण्यास टाळाटाळ केलेली नाही. सबब त्यांच्या विरुध्द झालेला "विना म्हणणे" आदेश रद्द होऊन त्यांचे म्हणणे दाखल करुन घेणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

**३.** अर्जदार यांनी नि.११ कडे त्यांचे म्हणणे देवून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जाबदार यांनी अर्जात नमुद केलेले कारण खोटे व चुकीचे असून त्यांना मान्य व कबूल नाही. तसेच जाबदार यांनी अर्जामध्ये किती दिवसाचा विलंब झाला आहे याबाबत कुठेही नमूद केलेले नाही. त्यामुळे जाबदार यांनी जाणुनबुजून विलंब केल्याचे दिसून येते. सबब, जाबदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली. तसेच यदाकदाचित सदरचा अर्ज मंजूर करणेच्या मतापर्यंत मे. न्यायालय आल्यास जाबदार यांना जास्तीत जास्त कॉस्ट बसवावी अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

**४.** अर्जामधील कथने जाबदार यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ नुसार दाखल केलेला आहे. जाबदार यांना अर्जाचे समन्स/नोटीस लागू झाल्यानंतर

ते दि.१४/०३/२०२४ रोजी प्रस्तुतकामी वकीलांमार्फत हजर झाल्याचे रोजनाम्यावरुन दिसून येते. त्यानंतर त्यांना आजारी असल्यामुळे वेळेत वकीलांना भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देता न आल्यामुळे त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाल्याचे कथन केले आहे. जाबदार यांनी अर्जात नमुद केलेले कारण योग्य व संयुक्तिक वाटत नाही. तसेच ते आजारी असलेबाबतचा कोणताही वैदयकीय पुरावा देखील जाबदार यांनी प्रस्तुतकामी दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांच्या तोंडी पुराव्यावर विसंबून राहता येणार नाही. परंतु नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून जाबदार यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. परंतु त्याकरिता जाबदार यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब देखील लक्षात घ्यावा लागेल. जाबदार यांच्या विलंबामुळे अर्जाचे कामकाज लांबणीवर पडलेने व त्यामुळे अर्जदारास झालेली गैरसोय लक्षात घेऊन जाबदार यांचा अर्ज रक्कम रु.२००/- अर्जदार यांना देण्याच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. जाबदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. जाबदार यांचे विरुध्द झालेला "विना म्हणणे" आदेश र.रु.२००/- खर्च अर्जदार यांना देणेचे अटीवर रदद करणेत येतो.

३. जाबदार यांनी प्रस्तुतचा खर्च न दिल्यास तो अर्जाच्या खर्चात समाविष्ट करुन घेणेत यावा.

४. जाबदार यांचे म्हणणे आज रोजी दाखल करुन घेण्यात येते.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2024.08.13 17:39:57 +0530

मिरज. **(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : १३/०८/२०२४ न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, मिरज

न्यायालय क्र.४

*****

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 13.08.2024 |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 13.08.2024 |
| Order uploaded on. | : | 13.08.2024 |